<u>नियमित दिवाणी दावा क्र.१४३/२०२० मधील निशाणी १५९ खालील आदेश</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

(२) वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून वादींचा १/३ हिस्सा अलग व पृथक होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये वादीचे असे कथन आहे की, सदर दाव्यातील वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे दि. १८/०८/२०२० रोजी मयत झालेले आहेत. वादी यांना वादी अथवा प्रतिवादी मयत झाल्यावर वारस रेकॉर्डवर आणावे लागतात या कायदेशीर बाबीची माहिती नसलेने व वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे मयत असलेची कल्पना आलेली नव्हती व त्यांचे मृत्येचा उतारा मिळाला नसलेमुळे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाला आहे. वादीने मुद्दाम जाणूनबुजून वारस कळविणेस विलंब केला नाही. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

(३) प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जावरच म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज व अर्जातील मजकूर मान्य नाही, कबूल नाही. वादी नं. १ब हे सन २०२० मध्ये असून वादींनी सदरचा अर्ज ३ वर्षे २ महिने उशीरा दिला आहे व त्यांचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण दिलेले नाही. सबब सदरचा अर्ज रद्द करणेत यावा. तसेच सदरचा अर्ज मंजूर करणेचा झालेस वादीस हेवी कॉस्ट करावी व ती प्रतिवादींना मिळावी. अशी विनंती प्रतिवादी तर्फे करणेत आली आहे.

(४) निशानी १५९ कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जान्वये वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत

विनंती केलेली आहे. वादीचे असे कथन आहे की, वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे दि. १८/०८/२०२० रोजी मयत झाले आहेत. वादीने असे कथन केले की, वादी यांना वादी अथवा प्रतिवादी मयत झाल्यावर वारस रेकॉर्डवर आणावे लागतात या कायदेशीर बाबीची माहिती नसलेने व वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे मयत असलेची कल्पना आलेली नव्हती व त्यांचे मृत्येचा उतारा मिळाला नसलेमुळे त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डला घेता आले नाहीत. प्रस्तुत दावा हा वाटपाचा दाखल केला आहे. तसेच दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीचे कथनाप्रमाणे वादी क्र.१ब दिलीप आण्णा लोंढे हे दि.१८/०८/२०२० रोजी मयत झाले आहेत व वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दि.११/०९/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. वादीने विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला केवळ या कारणास्तव अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. दाव्याचे स्वरुप विचारात घेता तसेच वादींनी केलेला विलंब पाहता प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींना र.रु.१०००/- खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

निशाणी १५९ कडील अर्ज वादीने प्रतिवादींना र.रु.१०००/- खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

Sd/-
(श्रीमती अ. ब. सोनटक्के)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.

विटा.
दिनांकः-१२.०३.२०२४.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | D.S.Kadam, Jr.Clerk |
| Name of the Court | :- | Smt. A. B. Sontakke,<br>2nd Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 12.03.2024 |
| Order signed by P.O. on | :- | 12.03.2024 |
| Order uploaded on | :- | 12.03.2024 |